" दैनिक सकाळ "
दि:- 31/12/2023

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीची सूचना

जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी परभणी जिल्ह्यात प्रस्तावित मानवत तालुक्यातील ०८, परभणी तालुक्यातील ०१, पूर्णा तालुक्यातील १४, जिंतूर तालुक्यातील ०५, गंगाखेड तालुक्यातील ०९, सेलू तालुक्यातील ०४, पालम तालुक्यातील १३, सोनपेठ तालुक्यातील ०३ व पाथ्री तालुक्यातील ०१ अशा एकूण ५८ वाळू घाटांच्या पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव दाखल केला आहे.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र. एस. ओ. १५३३, दि. १४/०९/२००६ (दिनांक १/१२/२००९ सुधारीत अधिसूचना) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोक सुनावणीचे आयोजन केले आहे.

सदर वाळुघाटाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सूचना, टिका टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविता येतील. लेखी स्वरुपात सूचना ही जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर पाठविता येतील.

**उप-प्रादेशिक कार्यालय,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पहिला मजला, देवकृपा इमारत,**
**रंगनाथ महाराजनगर, नांदखेडा रोड, परभणी- ४३१४०१**
**ई-मेल - sroparbhani@mpcb.gov.in**

तसेच तोंडी अथवा लेखी स्वरुपातील सूचना खालील ठिकाणी जाहीर लोकसुनावणीच्या कार्यवाही दरम्यान केल्या जाऊ शकतात.

**सुनावणीचे ठिकाण** :- जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
**सुनावणीची तारीख** :- दि. ०१/०२/२०२४, गुरुवार.
**सुनावणीची वेळ** :- सकाळी ११:०० वाजता.

सदर वाळुघाटासंबंधी माहिती असलेले दस्ताऐवज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करण्यात आलेले असून कार्यालयीन वेळेमध्ये संबंधीत व्यक्ती सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
२. जिल्हा उद्योग केंद्र, परभणी.
३. जिल्हा परिषद कार्यालय, परभणी.
४. तहसिल कार्यालय, परभणी, मानवत, पूर्णा, जिंतूर, गंगाखेड, सेलू, पालम, सोनपेठ, पाथरी, जि. परभणी.
५. ग्रामपंचायत कार्यालय, वांगी, राजुरा, टाकळी निलवर्ण, सावंगी मगर, कोथळा, शेवडी जाहांगीर, रामपुरी बु., पारडी टाकळी, ता. मानवत, नांदगांव खुर्द, ता. परभणी, सातेगांव, देवठाणा, मिठापूर, धनगर टाकळी, कंठेश्वर, वझुर, खरबडा, पिपळगांव सारंगी, निळा, कानखेड, ममदापूर, सुकी, पिंपळगाव बा., संदलापूर, ता. पूर्णा, सावळी बु., निलज, गणेशनगर, वझर बु., पिंपळगाव गायके, ता. जिंतूर, महातपुरी, गौडगांव, चिंचटाकळी, मुळी, धारखेड, झोला, मसला, नागठाणा, ता. गंगाखेड, खादगांव, सोन्ना, डिग्रस बु., आंबेगाव, ता. सेलु. राहाटी, फळा, रावराजुर, धनेवाडी, आरखेड, फरकंडा, बरबडी, सावंगी थडी, पिंपळगांव मु., सावंगी भु., गुंज, भोगाव, दुटका, ता. पालम, खडका / मोहळा, लासीना, थडी पिंपळगांव, ता. सोनपेठ. डाकु पिंपरी, ता. पाथरी
६. उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, देवकृपा इमारत, रंगनाथ महाराजनगर, नांदखेडा रोड, परभणी - ४३१४०१.
७. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण भवन, प्लॉट क्र. अ-४/१, एमआयडीसी, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३ रा मजला, शिव (पूर्व), मुंबई-४०००२२.
९. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
१०. पर्यावरण मंत्रालय, वने आणि हवामान बदल, तळ मजला, इस्ट विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हिल लाइन्स, नागपूर-४४००१.

स्वाक्षरित /-
**(श्री. रा. कुलकर्णी)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी.**